**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०८ नोव्हेंबर २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६५५/२०२३ भादवि ३०७,१४३,१४७,१४९,३२७,४२७,५००,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३०/१०/२०२३ रोजी दुपारी १६.०० वा चे सुमारास, राघवेंद्र स्वामी मठाजवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/११/२०२३ रोजी १५.२६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रताप शिवाजीराव कांचन, वय- ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. २४,२५, गणेश नगर, पुणे रोड, बाळे, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) योगेश पवार, २) राम जाधव, ३) रतिकांत पाटील, ४) ओंकार लोखंडे, ५) किरण वाघमारे, सर्व रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी हे मराठा संमाजासंबंधी विविध काम करतात त्यामुळे फिर्यादीचे मराठा समाजाचे तसेच इतर समाजाचे नेते व कार्यकर्ते यांचे सोबत ओळख आहे. गेल्या २० वर्षापासुन फिर्यादी सामाजिक चळवळीत काम करीत असुन गेल्या ६ मे ला तुळजापूर पासुन ते मुंबई पर्यंत एकुण ३१ दिवस पायी चालत तसेच ९६ दिवस आझाद मैदान, मुंबई येथे मराठा समाजाला ५० टक्के यातील ओ बी सी मधुनच टिकणारे आरक्षण मिळावे याकरीता फिर्यादी व फिर्यादीचे सहकारी यांनी आंदोलन केले व करत आहेत व प्रामाणिकपणे सरकारकडे मागणी करीत आहेत.<br>वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत मजकुर यांनी केमीकल युक्त काळे ऑईल घेवून येऊन, फिर्यादीस मराठा समाजाला कुणबी आरक्षण बाबत विरोध करतो असे म्हणत फिर्यादीस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या अंगावर केमिकल युक्त काळे ऑईल टाकुन शिवीगाळ करुन फिर्यादीस मारहाण केली आहे. त्यामध्ये सदरचे ऑईल फिर्यादीच्या डाव्या डोळयामध्ये व उजव्या कानात गेले. फिर्यादीच्या एकटयावर अचानक इतक्या लोकांनी हल्ल करुन फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न करुन फिर्यादीचे खिशातील रोख रक्कम ५,०००/- रु काढुन घेतले. तसेच फिर्यादीचे अंगावरील कपडे फाडुन फिर्यादीचा व्हिडीओ शुटींग करुन सोशल मिडीया, टिव्ही चॅनेल व वृत्तपत्र इत्यादीमध्ये पसरवुन फिर्यादीची बदनामी केली आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. तपास:- दुपोनि- देशमुख- **९४२१०८५८८८** |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६५४/२०२३ भादवि ४०६,४०९,४२०, महाराष्ट्र ठेवीदारांचे हित संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | सन-२०१२ पासुन ते आजपर्यंत चे दरम्यान, कलकम रियल इन्फ्रा (इंडिया) लि. कार्यालय, शुभराय टॉवर, शालीमार टॉकीजसमोर, दत्त चौक, सोलापूर व कलकम रियल इंन्फ्रा (इंडिया) लि. या कंपनीची शाखा दतत चौकातुन व्ही जी एफ ७१, द स्क्वेअर, बिझनेस सेंटर, मुरारजी पेठ, जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/११/२०२३ रोजी १४.४९ वा. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सौ. संगिता राजेंद्र सलगर, वय- ४० वर्षे, रा. मु.पो उमरगा, जि. उस्मानाबाद |
| **आरोपीचे नाव** | **:** | कलकम रियल इन्फ्रा लि. कंपनीचे मालक, सर्व पदाधिकारी, विष्णु दळवी, विजय सुपेकर, सुनिल रघुनाथ वांद्रे, अरविंद गोविंद वाघमारे, लक्ष्मण चंद्रकांत भोई, ज्ञानेश्वर साठे व त्यांचे सहकारी |
| **फसवणुक र** | **:** | १,००,३२,८५७/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील वरील आरोपीत यांनी सन २०1२ पासुन ते आजपर्यंत फिर्यादीचे नातेवाईक व फिर्यादीचे ओळखीचे लोक असे फिर्यादीसह एकुण- ३६५ गुंतवणुकदारांचे आर डी/दामदुप्पट पैसे करुन देतो असे म्हणून एकुण- १,००,३२,८५७/- रुपयेची आर्थिक फसवणुक केली असल्याने फिर्यादीची कलकम रियल इन्फ्रा (इंडिया) लि.या कंपनी व कंपनीचे मालक, सर्व पदाधिकारी व त्यांचे सहकारी यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे म्हणून. तपासः- सपोनि/ बनसवडे - **७८४३०९३७०६** |